## नि.दि.दावा क्र.२१६/२०१९ मधील नि.१५,१६ व १७ वरील एकत्रीत आदेश

१. वादीने प्रस्तुतचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होणेकरीता व हक्क ज्ञापन करीता दाखल केलेला आहे. निशाणी १५ वरील अर्ज हे मयत प्रतिवादी क्र.१ बाळू दामू जाधव याचे वारसांना अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होणेकरीता दाखल केलेले आहेत. निशाणी १६ वरील अर्ज हा प्रतिवादी क्र.१ याचे वारसांची नोंद करणेस व झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द ठरविणेकरीता (set aside) दाखल केलेला आहे. निशाणी १७ वरील अर्ज हा प्रतिवादी क्र.१ बाळू दामू जाधव दि.१५/०४/२०२१ रोजी मयत झाला तसेच प्रतिवादी नं.१ याची पत्नी शेषाबाई बाळू जाधव ही दि. ३/१०/२०२१ रोजी मयत झाली. सबब प्रतिवादी १ चे वारस अभिलेखावर आणणेकरीता प्रस्तुत दुरूस्ती अर्ज दाखल केला. निशाणी १५ ते १७ वरील अर्जांना प्रतिवादींनी म्हणणे दाखल करुन हरकत घेतली व अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

२. वादीतर्फे विधीज्ञ श्री.पी.ए.खासबागे व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.डी.एल.हांगे यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या अर्जात व म्हणण्यात नमूद मजकूराप्रमाणे युक्तीवाद केला. वर नमूद संपूर्ण बाबींचा व संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, यातील प्रतिवादी क्र.१ हा दिनांक १५/०४/२०२१ रोजी मयत झाले आहे ही बाब न्यायालयाला अगर वादीला प्रतिवादी नं. २ याचे वकीलांनी कळविले नाही. वादीने प्रस्तुतचे अर्ज हे शपथेवर दाखल केलेले आहेत. त्याने शपथेवर कथन केले की, त्याला कायदयाचे ज्ञान नाही तसेच तो अडाणी व अशिक्षीत असल्यामुळे मयत प्रतिवादी नं. १ याचे वारसांना अभिलेखावर घेणेस विलंब झाला आहे.

३. प्रतिवादी क्र.१ हा दि. १५/०४/२०२१ रोजी मयत झाल्याबाबत प्रस्तुत अर्जामध्ये नमूद आहे. निशाणी १९/१ वर त्याचे मृत्यूच्या दाखल्याची मूळ प्रत हजर असून त्याचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, प्रतिवादी क्र.१ हा दिनांक १५/०४/२०२१ रोजी मयत झाला व प्रस्तुत दाखला हा दि. १३/१०/२०२१ रोजी देण्यात आले आहे. सबब वरील सर्व बाबींचा विचार करता मी या निष्कर्षास आलो आहे की, वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब हा माफ करणे हे न्यायाच्या हिताच्या दृष्टीने जरुरीचे आहे तसेच प्रतिवादी क्र.१ यांचा हक्क उत्तरजीवी (survive) होत असल्याने झालेला अबेटमेंटचा हुकूम रद्द करणे जरुरीचे आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी असून तो तुर्तातुर्त मनाई अर्जाचे चौकशीसाठी प्रलंबित आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ हे दि. १५/०४/२०२१ रोजी मयत झाले. भारतीय मुदत कायदा आर्टीकल १२० प्रमाणे मृत्यू तारखेपासून ९० दिवसांमध्ये मयताचे वारसांना संचिकेवर आणणे गरजेचे आहे तसेच आर्टीकल १२१ प्रमाणे अवसान पावल्याचे तारखेपासून ६० दिवसांत अवसान पावलेचे हुकूम रद्द होणेसाठी अर्ज देणे गरजेचे आहे.

४. वर नमूद सर्व बाबींचा व संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, प्रस्तुतचे अर्ज मंजूर केल्यास दाव्याच्या अंतिम निकालावर निर्माण होणा–या उभयपक्षकारांतील वादप्रश्नांचे निरसन होण्यास मदत होईल. तसेच प्रस्तुत दाव्याचे हुकूमनाम्याची परिणामकारक बजावणी होण्याकरीता मयत प्रतिवादी क्र.१ याचे वारसांना अभिलेखावर सामील करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.१ यांचे हक्क हे उत्तरजीवी (survive) होत असल्याने त्याचे वारस अभिलेखावर येणे हे न्यायाच्या हिताच्या दृष्टीने गरजेचे झालेले असून झालेला विलंब हा माफ करणे व अवसान पावलेचा आदेश रद्द करणे

मला न्यायोचित वाटते. वादीला मृत्यु दाखला हा दि. १३/१०/२०२१ रोजी मिळाला होता वादीने प्रस्तुत अर्ज हे दि. १४/१०/२०२१ रोजी दाखल केले. सबब वरील सर्व बाबींचा विचार केला असता मला खालील आदेश पारीत करणे न्यायोचित वाटते.

**आदेश**

१. वादीचे निशाणी १५, १६ व १७ वरील अर्ज वर मंजूर करण्यात येतात.

२. वादीने निशाणी १५, १६ व १७ प्रमाणे प्रतिवादी क्र.१ याचे वारसांना आजपासून १४ दिवसांचे आत अभिलेखावर आणावे व दाव्याची दुरुस्ती प्रत द्यावी.

३. संबंधित लिपिकाने या दुरुस्तीच नोंद या दाव्याचे रजिस्टरला करावी.

( न्यायासनावरुन खुल्या न्यायालयात घोषित केले. )

GAJENDRA MADANLAL KOLHAPURE

Digitally signed by GAJENDRA MADANLAL KOLHAPURE
Date: 2022.01.24 11:06:03 +0530

म्हसवड (गजेंद्र म. कोल्हापुरे)

दिनांक १८/०१/२०२२ दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, म्हसवड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. U.B.Thorat Stenographer |
| Name of Court | C.J.J.D.,Mhaswad, Tal.Man |
| Date of Dictation | 18/01/2022 |
| Order signed by the P.O. on | 20/01/2022 |
| Order uploaded on | 24/01/2022 |